**हंगाम २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीतील किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान साठवणूकीसाठी भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या खाजगी / सहकारी संस्थांच्या गोदामांचे उर्वरित भाडे अभिकर्ता संस्थांच्या नफ्यामधून अदा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गोभादे-२०१६/प्र.क्र.१३५ /ना.पु.२९**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०९ एप्रिल, २०१८

**<u>प्रस्तावना:-</u>**

हंगाम २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीतील किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या साठवणूकीसाठी अभिकर्ता संस्थांकडून भाडयाने घेण्यात आलेल्या खाजगी/सहकारी संस्थांच्या गोदामांचे प्रलंबित भाडयाच्या देयकाची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

हंगाम २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीतील संस्थांचे भाडे केंद्र शासनाच्या दराने अदा करण्यात आले आहे. तथापि अभिकर्ता संस्थांनी गोदाम मालकांशी केलेल्या करारांनुसार भाडे मिळावे यासाठी गोदाम मालक आग्रही आहेत. कारण सदर कालावधीत विविध कारणांनी केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दोन महिने इतक्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी धान सदर गोदामांमध्ये साठवून ठेवला गेला. सदर संपूर्ण कालावधीचे भाडे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने मिळावे, अशी गोदाम मालकांची मागणी होती. सदर बाब केंद्र शासनाच्या निकषांत बसत नसल्याने त्यासाठीची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून मिळणार नाही.त्यामुळे यासाठी राज्य शासनाने खर्च करावयाचा असल्याने त्यासाठी सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यावर वित्त विभागाने "अभिकर्ता संस्थांना सदर योजनेची अंमलबजावणी करताना मागील काही वर्षामध्ये झालेला एकूण फायदा लक्षात घेऊन प्रलंबित गोदाम भाडयाच्या देयकाची रक्कम अदा करण्यासाठी शासनास अधिकचा भूर्दंड सोसावा लागणार असल्याने व तो सोसणे सध्याच्या आर्थिक अडचणींमुळे शक्य नसल्याने त्याकरीता शासनातर्फे वेगळा निधी उपलब्ध न करता अभिकर्ता संस्थांनी त्यांच्या नफ्यातून प्रलंबित देयके अदा करावीत असे अभिप्राय दिले आहेत. सदर अभिप्रायास अनुसरुन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

हंगाम २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीतील किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या साठवणूकीसाठी अभिकर्ता संस्थांकडून भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या खाजगी/सहकारी संस्थांच्या गोदामांचे प्रलंबित भाडयाच्या देयकाची रक्कम अभिकर्ता संस्थांनी त्यांना योजनेतून झालेल्या नफ्यातून अदा करावी.

२. याबाबत वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाने अंमलबजावणी व देखरेख ठेवावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७५/व्यय-१०, दि. २०.०२.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०४०९१५०४५७०००६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2018.04.09 15:08:02 +05'30'

**(सतिश सुपे)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव,
५. मा. मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव,
६. मा. मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव,
७. मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
११. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
१२. प्रधान सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई,
१४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,

१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि., कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई- ४०० ००९,

१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास भवन, २ रा माळा, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,नाशिक-२,

१७. सर्व विभागीय आयुक्त.

१८. नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा (गो/वा),मुंबई,

१९. सर्व जिल्हाधिकारी,

२०. सर्व उप आयुक्त (पुरवठा),

२१. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,

२२. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,

२३. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.

२४. सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,

२५. सर व्यवस्थापक,(महा.) भारतीय अन्न महामंडळ, ५ वा माळा, राजेंद्र नगर, दत्तपाडा रोड, बोरीवली पूर्व मुंबई-४०० ०६६,

२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( ५ प्रती ),

२७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला,विधान भवन,मुंबई. (१०प्रती)

२८. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, ( प्रत्येकी ५ प्रती ),

२९. सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य

३०. सर्व विरोधी पक्षनेते.

३१. निवड नस्ती (नापु-२९).

************